**<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. २४/२०१५ मधील निशाण नं. ३१ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी तर्फे दाखल करण्यात आला असुन त्याने असे नमुद केले आहे की दाव्यातील परिच्छेद क्र. १२ मधील कथन पाहता वादीने असे नमुद केले आहे की एकत्रीकरण अधिकारी, सिंधुदूर्ग यांनी अधिकार बाह्य, अवैध, रद्दबातल व निरर्थक आदेश पारित केले आहेत व ते अंमलबजावणीस पात्र नाहीत. सबब अशा परिस्थितीत एकत्रीकरण अधिकारी सिंधुदूर्ग यांच्या निर्णयाविरुध्द दाद मागण्यास Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1997 मधील तरतुदींची बाधा येणार आहे. तसा निर्णय देण्याचा अधिकार न्यायालयाला नाही त्यामुळे तसा मुद्दा काढून तसा निर्णय प्रथम देण्यात यावा अशी मागणी केली आहे.

२. वादी तर्फे निशाण ३६ येथे म्हणणे सादर केले असून त्याने असे कथित केले आहे की एकत्रीकरण अधिकारी, सिंधुदूर्ग यांचा आदेशाचे वैद्यतेबाबत कोणतीही दाद वादीने प्रस्तुत दाव्यात प्रार्थित केलेली नाही. गांव मौजे वरची केर, तालुका— वेंगुर्ला येथील सर्व्हे नं. ९ हिस्सा नं. ० या जमिनीपैकी ज्या विवक्षित क्षेत्रास सदर दाव्याचे परिच्छेद क्र. १२ मध्ये नमुद केलेल्या दरुस्त आकारफोडपत्रका प्रमाणे आणि त्याबाबतच्या गटबुक नकाशाप्रमाणे सर्व्हे नं. ९ हिस्सा नं. ६० असे सर्व्हे वर्णन देण्यात आले, त्या विवक्षित क्षेत्रात वादी कुटुंबाची स्थिर कब्जा अखंडपणे व शांततामय रित्या चालत आलेला आहे. हा सदर दाव्यातील मुख्य मुद्दा आहे. सर्व्हे नं. ९, हिस्सा नं. ६० या जमिनीचा सातबारा उतारा आज देखील अंमलात आहे. प्रतिवादीने त्याच्या कैफियतीत सर्व्हे नं. ९ हिस्सा नं. ५९ या जमिनीचे देखील उल्लेख केलेला आहे. सबब त्याने देखील दुरुस्ती आकारफोडपत्रक व त्याबाबतचा गटबुकनकाशा यांचे वर भिस्त ठेवलेली आहे. सबब एकत्रीकरण अधिकारी, सिंधुदूर्ग यांच्या आदेशाची वैधता अगर अवैधता याबाबतची कोणतीही दाद न मागितल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी वादीने केली आहे.

३. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा मनाई साठी दाखल करण्यात आलेला आह. आतापर्यंत प्राप्त

असलेल्या वादकथनांचा विचार केला असता असे दिसते की प्रतिवादीच्या मते वादी दावा मिळकत म्हणून जी संबोधित आहे ती मिळकत वास्तविकत: प्रतिवादीची आहे. म्हणजे ती सर्व्हे नं. ९ हिस्सा नं. ५९ आहे. दोन्ही पक्षकारांच्या वादकथनातून असे दिसते की आकारफोडपत्रक हे योग्य होते की अयोग्य होते, त्यानुसारची जी परिस्थिती आहे त्या बाबतचे मत मांडण्यासाठी पुरावा घ्यावा लागेल. तसेच पुरावा घेण्यासाठी प्रथमत: मुद्दे निश्चीत करावे लागतील. सबब ज्याअर्थी या क्षणाला या दाव्यामध्ये मुद्दे निश्चीत करण्यात आले नाहीत, त्याअर्थी प्रतिवादीने मागणी केल्याप्रमाणे उपरोक्त नमुद Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1997 या कायदयाअंतर्गत या दाव्यास कोणती बाधा येते किंवा कसे असा वादप्रश्न मुद्दा निश्चीत करताना आवश्यक वाटल्यास काढला जावू शकतो. त्याकरीता प्रथमत: तो मुद्दा काढून त्यावर निर्णय देणे हे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १९०८ प्रमाणे संयुक्तीक वाटत नाही. तसेच या दाव्यामध्ये सदर आदेशा विरुध्द कोणतीही दाद वादी मागत नाही आहे. त्या आदेशाचा परिणाम दोन्ही पक्षकारांच्या अधिकारावर होतो किंवा कसे ही बाब पुरावा घेवून लक्षात येणारी आहे. सबब त्यामुळे देखील या क्षणी तशा आशयाचा प्राथमिक मुद्दा काढणे योग्य वाटत नाही. म्हणून मी खालील आदेश पारित करतो.

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

सही/—

(वि.द.पाटील)

दिनांक— ०२/०२/२०१८

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.